# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ४ थे अंक २४६ वा बुधवार दि.२६ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# चॅम्पियन्स ट्रॉफीनंतर आयपीएलमध्ये बेटिंग



मुंबई : प्रतिनिधी यंदाच्या चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. मात्र आता विधान परिषदेचे नेते अंबादास दानवे यांनी चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सामन्याबाबत गंभीर आरोप केला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीदरम्यान सट्टा लावल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात केला. धक्कादायक बाब म्हणजे यामध्ये मुंबईतील काही पोलिस अधिका–यांचाही समावेश होता असेही अंबादास दानवे म्हणाले.

दरम्यान, न्यूझिलंडचा चार विकेट्स राखून भारतीय क्रिकेट संघाने पराभव करत चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ चे जेतेपद पटकावत ट्रॉफीवर आपले नाव कोरले. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी पुन्हा एकदा परिषदेत पेनड्राईव्ह बॉम्ब फोडला. चॅम्पियन्स ट्रॉफीमध्ये मोठ्या प्रमाणात बेटिंग झाल्याचा आरोप अंबादास दानवे यांनी केला. त्यानंतर आता इंडियन प्रीमियर लीगच्या सामन्यांमध्येही सट्टा लावण्यासाठी मुंबईत बैठका झाल्याचे अंबादास दानवे म्हणाले. यामध्ये मुंबई पोलिसांच्या बड्या अधिका–यांचाही समावेश असल्याचे अंबादास दानवे म्हणाले. आयपीएलच्या बेटिंगसाठी काही व्यक्ती मुंबईत आल्याची माहिती अंबादास दानवे यांनी सभागृहाला दिली. यावेळी अंबादास दानवे यांनी एक पेनड्राईव्ह देखील सादर केला.

पोलिसांच्या सहाय्याने सट्टा लोटस २४ नावाचे क्रिकेट बेटिंग ॲप आहे. यातील मेहुल जैन, हिरेन जैन आणि कमलेश जैन हे बेटिंग करतात. पाकिस्तानातल्या लोकांशी, खेळाडूंशी यांचे संबंध आहेत आणि संपर्कात सुद्धा आहेत. ते खुलेआम मुंबईतल्या बड्या पोलिस अधिका–यांसोबत बैठक करतात. चॅम्पियन्स ट्रॉफी सामने संपल्यानंतर आता आयपीएलसाठी ते दुबईवरून मुंबईत आले आहेत. या पेनड्राईव्हमध्ये त्यांनी पाकिस्तानात बेटिंगसाठी काय काय केलेलं आहे हे तुम्ही ऐका. त्याच्यामध्ये कोणत्या कोणत्या पोलिस अधिका–याचे नाव घेतले आहे ते तुम्ही तपासा. खुलेआम पोलिसांच्या सहाय्याने अशा प्रकारच्या घटना या राज्यात घडत आहेत, असे अंबादास दानवे यांनी म्हटले.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकृषी कर रद्द केल्याची केली घोषणा लातूर तहसीलदारांच्या अकृषी कर वसुलीच्या कार्यवाही बाबत आमदार अमित देशमुख यांनी मुख्यमंत्र्यांसोबत केली होती चर्चा

मुंबई / प्रतिनिधी :– राज्यातील अकृषी कर रद्द करण्याचा निर्णय शासनाने घेतलेला असताना, लातूर तहसीलदारांनी अकृषी कर वसुलीसाठी लातूर महानगरपालिकेचे व्यापारी संकुल सील केल्याची बाब माजी मंत्री आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लक्षात आणून दिली. यानंतर, ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेतलेल्या निर्णयानुसार राज्यातील निवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनींचा औद्योगिक कर रद्द करण्यात आल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी विधानसभेत अंतिम आठवडा प्रस्तावावरील चर्चेला उत्तर देताना स्पष्ट केले. लातूर महापालिकेने अकृषी कर भरला नसल्यामुळे लातूर तहसीलदार सौदागर तांदळे यांनी सोमवार, दि. २४ मार्च रोजी लातूर येथील यशवंतराव चव्हाण व्यापारी संकुल सील करण्याची कार्यवाही केली होती. या संदर्भातील माहिती मिळाल्यानंतर माजी मंत्री आणि आमदार अमित विलासराव देशमुख यांनी मुंबई येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी या विषयावर चर्चा केली. गाव आणि महापालिका हद्दीतील अकृषी कर रद्द करण्याचा निर्णय शासनाने ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या बैठकीत यापूर्वीच घेतला होता. मात्र, शासन आदेश अद्याप प्रसिद्ध झालेला नाही, ही बाब आमदार देशमुख यांनी या चर्चेदरम्यान मुख्यमंत्र्यांच्या लक्षात आणून दिली. लातूर महापालिका आणि इतर शासकीय, निमशासकीय आस्थापनांना दिलासा मिळण्याच्या दृष्टीने यासंदर्भातील शासन आदेश लवकरात लवकर प्रसिद्ध करण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आमदार अमित विलासराव देशमुख यांना दिले. मंगळवार, दि. २५ मार्च रोजी अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान अंतिम आठवडा प्रस्तावाला उत्तर देताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकृषी कराच्या निर्णयाबाबत स्पष्टीकरण दिले. महाराष्ट्र मंत्रिमंडळाच्या ४ ऑक्टोबर २०२४ रोजी झालेल्या बैठकीत राज्यातील निवासी, वाणिज्य आणि औद्योगिक वापराखालील जमिनींचा औद्योगिक कर रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली. राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अकृषी कर रद्द झाल्याबाबत विधानसभेत माहिती दिल्याने लातूर येथील तहसीलदार सौदागर तांदळे यांनी अकृषी कर वसुलीसाठी लातूर महानगरपालिकेचे व्यापारी संकुल सील करण्याची कार्यवाही चुकीची होती, हे आता स्पष्ट झाले आहे.

# अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत बैठक संपन्न







लातूर/ प्रतिनिधी: महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांच्या उपस्थितीत मंगळवारी २५ मार्च २०२५ रोजी महानगरपालिकेत बैठक घेण्यात आली. यावेळी लोखंडे यांनी मनपाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा आढावा घेत समाधान व्यक्त केले.

या बैठकीस मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव,उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, मुख्य लेखाधिकारी रावसाहेब कोलगणे, मुख्य लेखा परीक्षक कांचन तावडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना लोखंडे यांनी लाडपागे कमिटीच्या शिफारशीनुसार सफाई कामगारांच्या वारसांना नियुक्ती देण्यासाठी उपाययोजना करण्याच्या सूचना केल्या. वारसांची कागदपत्र हस्तगत करण्यासाठी विशेष कॅम्पचे आयोजन करून एक महिन्यात सर्व प्रकरणे निकाली काढावी असे निर्देश दिले.मनपाकडे कार्यरत असणाऱ्या सर्व सफाई कामगारांची वेळोवेळी आरोग्य तपासणी केली जावी. त्यासाठी आरोग्य शिबिरांचे आयोजन करावे.सफाई कामगारांच्या सुरक्षिततेसाठी हॅन्ड ग्लोव्हज, गम बूट, मास्क, टोपी या सुरक्षा साधनांचा पुरवठा करावा. शहरातील सर्व रुग्णालयांना बायो मेडिकल वेस्ट स्वतंत्रपणे संकलित करण्यास सांगावे. सफाई कामगारांची मुले शाळेत जातात का? याची तपासणी करावी, अशा सूचनाही त्यांनी केल्या.

यावेळी बोलताना लोखंडे यांनी अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांसाठी राबविण्यात येणाऱ्या रमाई घरकुल योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यास सांगितले. या योजनेचा संबंधितांना लाभ मिळवून द्यावा. दलित वस्ती योजनेअंतर्गत प्राप्त होणा–या निधीतुन गुणवत्तापूर्ण व्हावी,अशी अपेक्षाही लोखंडे यांनी व्यक्त केली.

प्रारंभी आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी लोखंडे यांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. शासनाच्या सर्व योजनांची लातूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही मनोहरे यांनी लोखंडे यांना अवगत केले.

या बैठकीस सर्व सहाय्यक आयुक्त आणि अधिकाऱ्यांचीही उपस्थिती होती. उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# माफी मागणार नाही; कुणाल कामरा

मुंबई : प्रतिनिधी कॉमेडियन कुणाल कामरा तामिळनाडूत असल्याचे एका फोन कॉलमध्ये त्याने कबूल केले आहे. सध्या त्याचा फोन नंबर लीक झाला असून यावर त्याला धमकीचे कॉल येत आहेत. कुणाल कामराला शोधण्यासाठी, त्याला धमकी देणा–यासाठी त्याने एक पोस्ट लिहून इशारा दिला आहे. सविस्तर पत्र लिहून त्याने आपली भूमिका स्पष्ट केली आहे आणि आपण काहीही चुकीचे केले नसल्याचे म्हटले आहे.

दरम्यान, त्याचा फोन नंबर लीक करून त्याला धमकी देण्याचा प्रयत्न करणा–यांसाठीही त्याने एक खास इशारा दिला आहे. यात तो म्हणतो, जे लोक माझा नंबर लीक करण्यात गुंतले आहेत किंवा मला सारखा कॉल करत आहेत त्यांच्यासाठी : तुम्हाला आतापर्यंत हे लक्षात आले असेल की सर्व अनोळखी कॉल माझ्या व्हॉईसमेलवर जातात, तिथे तुम्हाला तेच गाणे ऐकायला मिळेल जे तुम्हाला आवडत नाही. मी माफी मागणार नाही. मी जे काही बोललो नेमके तेच अजित पवार (उपमुख्यमंत्री) यांनीही एकनाथ शिंदे यांच्याबद्दल म्हटले होते. मी जमावाला घाबरत नाही आणि मी पलंगावर लपून बसून मामला थंड होण्याची वाट पाहणा–यांपैकीही नाही, असेही कुणाल कामराने म्हटले आहे.

कुणाल कामराला फोनवरून धमकी

कुणाल कामराला धमकी देण्याचा सातत्याने प्रयत्न सुरू आहे. त्याचा फोन नंबर लीक झाल्याने काही शिंदे समर्थक त्याला फोन करून शिवीगाळ करत आहेत. आज सकाळी काँग्रेसच्या नेत्या सुप्रिया श्रीनेत यांनी कुणालला धमकी दिली जात असल्याचा एक व्हीडीओ पोस्ट केला आहे.

# सोलापूर रेल्वे विभाग २४ विशेष उन्हाळी रेल्वे गाड्या चालवणार



सोलापूर–मध्यरेल्वेच्या सोलापूर विभागा मार्फत उन्हाळी सुट्ट्यांची सुरवात आणि प्रवाशांची वाढती संख्या लक्षात घेता, प्रवाशांची अतिरिक्त गर्दी कमी करण्यासाठी मुंबई–नांदेड दरम्यान २४ उन्हाळी विशेष गाड्या चोलवण्याचा निर्णय घेतला आहे. याविशेष गाड्यांना सोलापूर विभागातील कुडूवाडी आणि लातूर या दोन स्थानकांवर थांबा देण्यात आला आहे.

एलटीटी मुंबई – हुजूर साहेब नांदेड साप्ताहिक विशेष गाडीच्या २४ फेऱ्या आहेत. रेल्वे क्रमांक ०११०५ साप्ताहिक विशेष गाडी ९ एप्रिल ते २५ जूनपर्यंतएलटीटी मुंबईहून दर बुधवारी रात्री १२.५५ वाजता निघतील आणि त्याच दिवशी सायंकाळी ७ वाजता हुजूर साहेब नांदेड येथे पोचेल. गाडी क्रमांक ०११०६ साप्ताहिक विशेष गाडी ९ एप्रिल ते २५ जून या कालावधती हुजूर साहेब नांदेड येथून दर बुधवारी रात्री ८ वाजता निघेल आणि दुसऱ्या दिवशी दुपारी २. ४५ वाजता एलटीटी मुंबई येथे पोहोचेल. या गाडीला ठाणे, कल्याण, लोणावळा, पुणे, दौंड, कुडूवाडी, लातूर, लातूर रोड, परळी वैजनाथ, गंगाखेड, परभणी आणि पूर्णा हे थांबे आहेत. दरम्यान, या गाडीसाठी एक प्रथम वातानुकूलित, एक द्वितीय वातानुकूलित, पााच तृतीय वातानुकूलित, आठ स्लीपर क्लास, चार सामान्य द्वितीय श्रेणी, एक पॅन्ट्री कार (लॉक्ड कंडिशन), एक जनरेटर व्हॅन आणि एक द्वितीय श्रेणीसह गार्ड ब्रेक व्हॅन असे २२ कोच असतील.

# खगोलशास्त्रज्ञांनी शोधली सर्वात लहान आकाशगंगा

वॉशिंग्टन : वृत्तसंस्था खगोलशास्त्रज्ञांनी सुमारे ३० लाख प्रकाशवर्षे दूर असलेल्या सूक्ष्म आकाशगंगांचा संग्रह शोधला आहे, ज्यामध्ये आतापर्यंत पाहिलेली सर्वात लहान आणि अस्पष्ट आकाशगंगा समाविष्ट आहे. ही आकाशगंगा अँड्रोमेडा 'एक्सएक्सएक्सव्ही' म्हणून ओळखली जाते आणि तिच्या अन्य सहकारी आकाशगंगा आपल्या शेजारील अँड्रोमेडा आकाशगंगेभोवती परिभ्रमण करत आहेत. हा शोध ब्रह्मांडाच्या उत्क्रांतीबद्दल आपल्या समजुतीत मोठा बदल घडवू शकतो. एवढ्याशा लहान आकाशगंगा सुरुवातीच्या ब्रह्मांडातील उष्ण आणि घन स्थितीत टिकून राहू शकत नव्हत्या. तरीही, ही आकाशगंगा नष्ट न होता कशी टिकली, हा मोठा प्रश्न आहे. मिशिगन विद्यापीठाचे प्राध्यापक आणि संशोधन पथकातील सदस्य एरिक बेल म्हणतात, 'ही पूर्णपणे कार्यक्षम आकाशगंगा आहे, पण ती आपल्या मिल्की वे आकाशगंगेपेक्षा सुमारे दशलक्ष पट लहान आहे. जणू एखादा परिपूर्ण मनुष्य तांदळाच्या कण्याएवढ्या आकाराचा आहे!' बटू आकाशगंगा ही संकल्पना वैज्ञानिकांसाठी नवीन नाही. आपल्या मिल्की वे आकाशगंगेभोवती अशा अनेक लहान उपगंगा आहेत.तथापि, बटू आकाशगंगा अत्यंत अस्पष्ट आणि लहान असल्याने त्यांचा शोध घेणे आणि त्यांचा अभ्यास करणे कठीण आहे. आपल्या 'मिल्की वे' नावाच्या आकाशगंगेभोवती असलेल्या बटू आकाशगंगांची माहिती आपण आतापर्यंत घेतली होती, म त्र इतर आकाशगंगांच्या भोवती अशा लहान आकाशगंगांचा शोध घेणे कठीण होते.

# विधानसभा उपाध्यक्षपदासाठी अजित पवारांचे कट्टर समर्थक अण्णा बनसोडे यांचा अर्ज दाखल



मुंबई, : विधानसभा उपाध्यक्षपदासाठी उद्या, २६ मार्च २०२५ रोजी होणाऱ्या निवडणुकीसाठी अर्ज भरण्याचा आज शेवटचा दिवस आहे. यासाठी महायुतीच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे पिंपरीचे आमदार अण्णा बनसोडे यांनी आपला अर्ज दाखल केला.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, मंत्री उदय सामंत, चंद्रकांत पाटील उपस्थित होते. बनसोडे यांची निवड बिनविरोध होईल, असे दिसते. नरहरी झिरवळ यांची मंत्रीपदी वर्णी लागल्यानंतर अजित पवार गटाकडून अण्णा बनसोडे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. दरम्यान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटाकडून विधानसभेच्या उपाध्यक्षपदासाठी आमदार अण्णा बनसोडे यांचा अर्ज दाखल करण्यात आला. अण्णा बनसोडे हे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे कट्टर समर्थक समजले जातात. ते पिंपरी मतदारसंघातून विधानसभेवर निवडून गेले आहेत.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....

### पुनर्रचना वाद आणि असंतुलनाची भीती

भारतात लोकशाही प्रतिनिधित्वाचा आधार ‘एक नागरिक, एक मत, एक मूल्य’ या सिद्धांतावर आहे. मात्र लोकसंख्येच्या आधारावर देशातील मतदारसंघाची फेररचना करण्यात येणार असल्याने हा मुद्दा आता एका मोठ्या वादाच्या केंद्रस्थानी आला आहे. लोकसभा जागांचे पुर्नवाटप हे आता पुढील जनगणनेच्या आकडेवारीवर आधारित असणार आहे. यामुळे क्षेत्रीय असंतुलन आणि राजकीय शक्तीच्या पुनर्रचनेची समस्या निर्माण होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

विशेषतः दक्षिणेतील राज्ये तामिळनाडू आणि केरळ यांसारख्या राज्यांनी लोकसंख्येच्या आधारावरील मतदारसंघ पुनर्रचनेवर चिंता व्यक्त केली आहे. लोकसंख्येच्या आधारे निवडणूक जागांचे वाटप ही त्यांची संसदीय ताकद कमी करू शकते आणि याचा फायदा उत्तर भारतातील उत्तर प्रदेश आणि बिहार यांसारख्या राज्यांना होऊ शकतो, अशी भीती तामिळनाडू आणि केरळ या राज्यांनी व्यक्त केली आहे. हा मुद्दा केवळ घटनात्मक सिद्धांतांशीच संबंधित नाही; तर भारताच्या संघीय संरचनेला आणि क्षेत्रीय संतुलनालाही धक्का लावू शकते, असे या राज्यांचे म्हणणे आहे. सध्याच्या परिस्थितीत तामिळनाडूची लोकसंख्या देशाच्या एकूण लोकसंख्येच्या ५.४२ टक्के आहे; पण लोकसभेत त्यांची हिस्सेदारी ७.१८ टक्के आहे. जर २०२६ च्या मतदार संघाच्या पुर्नरचनेनंतर केवळ लोकसंख्येचा आधार घेतला गेला तर तामिळनाडूला लोकसभेच्या सध्याच्या ३९ जागा कायम ठेवण्यासाठी त्यांची लोकसंख्या ७.७ कोटींपासून ती वाढून १०.१९ कोटी इतकी असावी लागेल. पण ही गोष्ट अशक्य आहे. कारण तामिळनाडू राज्याचा जनन दर केवळ २.५२ इतका आहे. त्यामुळे याचा फटका त्यांच्या लोकसभेच्या जागांना बसण्याची शक्यता आहे. दुसरीकडे उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांचा प्रजनन दर अधिक आहे. त्यामुळे उत्तर प्रदेश आणि बिहारच्या लोकसभेच्या जागा वाढू शकतात आणि यामुळे पाच दक्षिणी राज्ये एकत्रितरीत्या लोकसभेच्या २४ जागा गमावू शकतात; तर चार हिंदी भाषिक राज्यांना लोकसभेच्या ३४ जागा अधिक मिळू शकतात. या असंतुलनाचा फटका केवळ क्षेत्रीय प्रतिनिधित्वाला बसणार नाही तर राजकीय पक्षांसमोरही नवीन आव्हाने निर्माण करेल. मतदारसंघ पुनर्रचनेचा हा वाद दोन मूलभूत प्रश्न उपस्थित करतो. पहिले म्हणजे लोकसंख्येच्या आधारे जागांचे वाटप हे ‘एक मत, एक मूल्य’ या सिद्धांताचे पालन करते काय? जर ते करत असेल तर नैसर्गिकपणे दक्षिणी राज्यांचे प्रतिनिधित्व कमी होईल. पण दुसरा प्रश्न असा आहे की, हे भारताच्या संघीय संरचनेसाठी हे योग्य आहे काय? देशातील प्रत्येक राज्याची स्वतंत्र ओळख आणि हित आहे.

दक्षिणी राज्यांच्या म्हणण्यानुसार, त्यांचा कमी प्रजनन दर आणि लोकसंख्येवर नियंत्रण मिळवल्याने त्यांच्या लोकसभेच्या जागा कमी होऊ नयेत. तर दुसरीकडे, उत्तर भारतातील राज्ये याला निष्पक्षतेचा मुद्दा मानत आहेत. अमेरिकेसारख्या संघीय देशांचा तुलनात्मक विचार करता तेथे सिनेटीमध्ये प्रत्येक राज्याला लोकसंख्येचा विचार न करता दोन जागा दिल्या जातात. भारतामध्ये राज्यसभेत अशा प्रकारचे समान प्रतिनिधित्व नाही. तेथे जागा केवळ लोकसंख्येच्या प्रमाणातच दिल्या जातात. त्यामुळे मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा आणखी गुंतागुंतीचा होत आहे. यावर तोडगा काढण्यासाठी अनेक प्रस्ताव समोर आले आहेत. पहिला प्रस्ताव म्हणजे लोकसभेच्या जागा लोकसंख्येच्या आधारावर कठोरपणे पुनर्वितरित करणे. हे संवैधानिकदृष्ट्या योग्य असू शकते. पण यामुळे दक्षिणेतील राज्यांमध्ये असंतोष वाढू शकतो. दुसरा पर्याय असा की, सध्याची रचना जैसे थे ठेवणे आणि मतदारसंघ पुनर्रचनेचा मुद्दा पुढे ढकलणे होय आणि हेच दक्षिणी राज्यांच्या हिताचे असू शकते. तिसरा आणि व्यावहारिक मध्यम मार्ग आहे, तो म्हणजे लोकसभेच्या जागा वाढवणे! यामुळे कोणत्याही राज्याला त्यांच्या सध्याच्या जागा गमावता येणार नाहीत आणि अतिरिक्त जागा लोकसंख्येच्या आधारे वाटल्या जाऊ शकतात. उदाहरणार्थ लोकसभेतील जागा ५४३ पेक्षा वाढवून ८०० पर्यंत करता येतील. यामुळे दक्षिणी राज्यांचा होणारा तोटा रोखला जाईल आणि उत्तरेच्या राज्यांना त्यांच्या लोकसंख्येच्या प्रमाणानुसार योग्य तो वाटा मिळू शकतो. तथापि, हे समस्येचे संपूर्ण समाधान नाही. कारण क्षेत्रीय असंतुलन कायम राहील. चौथा प्रस्ताव राज्यसभेच्या पुनर्गठनावर केंद्रित करण्याचा आहे. जर लोकसभेतील जागा लोकसंख्येच्या आधारे वाटल्या जात असतील, तर राज्यसभेत प्रत्येक राज्याला समान प्रतिनिधित्व दिले जाऊ शकते. यामुळे संतुलन राखले जाऊ शकते.

अमेरिकेच्या तंत्रानुसार प्रत्येक राज्याला १० ते १२ राज्यसभा जागा दिल्या जाऊ शकतात. भले त्यांची लोकसंख्या कितीही असो. यामुळे दक्षिणी राज्यांना लोकसभेत गमावलेल्या जागांच्या ताकदीची भरपाई होईल आणि संघीय संरचनाही मजबूत होण्यास मदत होईल. मतदारसंघ पुनर्रचनेचा वाद हा लोकसंख्येबाबतच नाही तर तो भारताच्या लोकशाही आणि संघवादाच्या आत्म्याशी संबंधित आहे. यामुळे कोणताही तोडगा तोपर्यंत यशस्वी होणार नाही, जोपर्यंत तो घटनात्मक सिद्धांत आणि क्षेत्रीय संवेदनांच्या दरम्यान संतुलन ठेवणार नाही. लोकसभेचा विस्तार आणि राज्यसभेची पुनर्रचना एकत्रितपणे या दिशेने प्रभावी पाऊल ठरू शकतात. यासाठी संसदेत व्यापक सहमती आणि घटनात्मक सुधारणा आवश्यक असतील. भारताची लोकशाही लोकसंख्येच्या निष्पक्षतेला प्राधान्य देईल की संघीय समानतेला, याचा विचार करणे हे महत्त्वाचे आहे. दोन्हीच्या दरम्यान संतुलनच या वादाचे दीर्घकालीन उत्तर ठरू शकेल.

# न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरात तब्बल करोडोंची रोकड,हे चाल्लय तरी काय!

न्या.यशवंत वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी लागलेली आग विझविण्यात आल्यानंतर एका खोलीत मोठ्या प्रमाणात करोडोंची रोख रक्कम सापडल्याचे वृत्त प्रसारमाध्यमांनी प्रसिद्ध केले होते. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमने त्यांच्या विरोधात प्राथमिक चौकशी सुरू केली व त्यांची पुन्हा अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घेण्यात आला.दिनांक १४ मार्च २०२५ ला न्या.वर्मा यांच्या अधिकृत निवासस्थानी आग लागल्यानंतर ताबडतोब कुटुंबीयांनी अग्निशमन दल व पोलिसांना याची माहिती दिली.परंतु आग विझवल्यानंतर पोलिसांना एका खोलीत अंदाजे १५ करोड रुपये सापडल्याचे वृत्त समोर येताच न्यायपालिका क्षेत्रात मोठी खळबळ उडाली.यावर सर्वोच्च न्यायालयाच्या कॉलेजियमकडून सावसावर करण्यात आली व न्या.वर्मा यांची पुन्हा अलाहाबाद उच्च न्यायालयात बदली करण्याचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती समोर आली. त्यानंतर अलाहाबाद उच्च न्यायालय बार असोसिएशनने या निर्णयाला तिव्र विरोध दर्शवत म्हणाले की,आमचे न्यायालय म्हणजे कचरा पेटी नाहीअशी प्रखर प्रतिक्रिया बार असोसिएशनकडून व्यक्त करण्यात आली.न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या घरात ऐवढी मोठी रोकड सापडने म्हणजे न्यायव्यवस्थेला व समाजाला अंधारात ठेवून देशाची दिशाभूल करण्याचे काम वर्मांनी केले. त्यांना कोणत्याही स्तरातुन माफी नको.आज देशात बेरोजगारी, महागाई,भुकमरी सारख्या अत्यंत गंभीर व मोठ्या समस्या समोर असतांना देशाचा जबाबदार व्यक्ती करोडो रुपये वाममार्गाने किंवा अन्य मार्गाने कमवितो मग सर्वसामान्यांनी काय करावे!असाही प्रश्न उपस्थित होतो.त्यामुळे आता प्रश्न निर्माण झाला आहे की एवढा पैसा आलाच कोठुन!वर्माच्या उघडकीस आलेल्या या करोडो रुपयांवरून सिध्द होते की वर्मा न्यायदेवतेची अवमानना करून चुकीच्या मार्गाने पैसा कमवित असावेत. कारण आजच्या परिस्थितीत अपराधातुन किंवा गुन्हेगारीतुन मुक्ती मिळावी यासाठी खालुन तर वर्तीपर्यंत पैसे द्यावे लागतात असे म्हटल्या जाते.त्यातलेचे वर्मा असावेत ज्यांनी पैशासाठी अनेकांचा बळी घेतला असावा यालाही नाकारता येत नाही. दिल्ली उच्च न्यायालयाचे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्या शासकीय निवासस्थानी आग लागल्याच्या घटनेत स्टोअर रूममध्ये प्रचंड रक्कम नोटांच्या स्वरूपात सापडल्यानंतर खळबळ उडाली असतांनाच आता घराच्या आवारातही अर्धवट जळालेल्या नोटा सापडल्याने या अग्निकांडातील संशयाची धग आणखीनच वाढली आहे.या संपूर्ण घटनेवरून स्पष्ट होते की वर्माने कायद्याचे उल्लंघन



करून वाममार्गाने किंवा चुकीच्या मार्गाने पैसा कमवित असावेत. त्यांची जागा आता न्यायालयात नसुन पोलिस कोठडीत असायला पाहिजे.माननीय सरन्यायाधीश न्या.वर्मा यांना राजीनामा किंवा स्वेच्छानिवृत्ती घेण्यास सांगितले जाऊ शकते असे वर्तविण्यात येत आहे.परंतु माननीय सरन्यायाधीशांनी असे न करता सखोल चौकशी करून कठोर कारवाई करावी. कारण एखाद्या जबाबदार पदावर असणाऱ्या व्यक्तींच्या घरात एवढी मोठी रोख रक्कम सापडने लोकशाहीसाठी अत्यंत गंभीर व धक्कादायक बाब आहे. त्यामुळे वर्मानी गुन्हा केला असेल तर त्यांच्यावर सर्वसामान्याप्रमाणे कठोर कारवाई व्हायलाच पाहिजे असे माझे स्पष्ट मत आहे.अचानक त्यांच्या अधिकृत निवासस्थानी आग लागावी आणि त्यांचे काळे कारणामे व अवैध रोकड अचानक सामोरं यावी अशी घटना घडली. सरकारने अशांवर फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून कारवाई करून ताबडतोब कठोर शिक्षा करावी आणि अधिकृत निवासस्थानी फक्त १५ करोडच सापडले बाकी अनेक ठिकाणी वर्मांनी पैसा लपवून ठेवले असावेत किंवा गुंतविले असावेत यालाही नाकारता येत नाही.त्यामुळे आजच्या परिस्थितीत वर्मा करोडोचा धनी नसुन अरबो रूपयांचा धनी असल्याचे त्यांच्या चुकीच्या कारनाम्यावरून लक्षात येते.आजच्या परिस्थितीत यशवंत वर्मा सारखे लोक न्यायपालिकेसाठी मोठा धब्बा आहे असे मला वाटते.कारण अधिकृत निवासस्थानी जळलेल्या नोटांचे बंडल आढळल्याचा व्हिडिओ सुध्दा प्रस्तुत झाला,यात आता काहीच लपण्यालायक किंवा संशयास्पद नाही.न्या.वर्मा यांच्या निवासस्थानी कथितरित्या सापडलेल्या मोठ्या प्रमाणातील रोख रकमेबाबत दिल्ली उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश देवेंद्र कुमार उपाध्याय यांनी आपला २५ पानी चौकशी अहवाल सरन्यायाधीशांना सादर केला.या संपूर्ण घटनेवरून यशवंत वर्मा न्यायपालिकेचे मोठे अपराधी आहेत हे सिद्ध होते. सरन्यायाधीशांकडुन चौकशीसाठी अंतर्गत समिती स्थापन करण्यात येत असल्याचे सांगितले जाते.परंतु माझ्या मते चौकशी करीता कोणत्याही प्रकारच्या समितीची गरज नसावी. कारण जळलेल्या नोटांचा व्हिडिओ पोलिसांकडून प्रस्तुत झालेला आहे.त्याचप्रमाणे सोशल मीडियावर,न्युज चॅनलवर सुध्दा व्हायरल झाला आहे. त्यामुळे याप्रकरणात राष्ट्रपती, प्रधानमंत्री, सरन्यायाधीश व सर्वोच्च न्यायालयाने हस्तक्षेप करून फास्ट ट्रॅक कोर्टच्या माध्यमातून यशवंत वर्मा यांच्यावर कठोर कारवाई करावी. कारण कायदाच सांगतो की गुन्हेगारांना माफी नाहीच त्याच आधारे न्यायाधीश यशवंत वर्मा यांच्यावर कारवाई झालीच पाहिजे.जय हिंद!

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर

# प्रश्न विदेशी पर्यटकांच्या सुरक्षिततेचा

गेल्या काही दिवसांत भारतात महिलांविरोधातील गुन्ह्यांत मोठी वाढ झालेली दिसून येते. यामुळे जगभरात आपली नाचक्की होत असतानाच विदेशी महिला पर्यटकही नराधमांच्या वासनांचे बळी ठरत आहेत, ही बाब प्रचंड चिंताजनक आहे. कर्नाटकातील हंपी येथे एका इस्रायली महिला आणि एका भारतीय महिलेसह दोन महिलांवर सामूहिक बलात्काराची घटना ताजी असतानाच, दिल्लीमध्ये एका ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे.

पर्यटनव्यवसाय हा भारताच्या अर्थव्यवस्थेतील महत्त्वाच्या क्षेत्रांपैकी एक आहे. भारतात जीडीपीच्या ६.७ टक्के योगदान पर्यटनउद्योगाचे आहे. २०१४-१५ मध्ये पर्यटन आणि हॉटेल्स क्षेत्राची एकूण उलाढाल सुमारे २८ लाख कोटी रुपये होती, जी २०२५ पर्यंत ५८ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे. पर्यटन क्षेत्रामुळे देशातील एकूण रोजगारामध्ये ८.७८ टक्के योगदान असून यामुळे सुमारे २ कोटी लोकांना रोजगार मिळतो. विदेशी पर्यटकांच्या आगमनामुळे भारताला परकीय



चलन मिळते. देशाच्या आर्थिक स्थैर्यासाठी ते महत्त्वाचे ठरते. ब्यूरो ऑफ इमिग्रेशन डेटानुसार, २०२३ मध्ये भारतात ९.५२ दशलक्ष परदेशी पर्यटकांचे आगमन झाले. २०२२ च्या तुलनेत ही संख्या सुमारे ५० टक्क्यांनी वाढली. यातून २,३१,९२७ कोटी रुपयांची परकीय चलन कमाई झाली असून २०२२ च्या तुलनेत ती ३६.५ टक्क्यांनी वधारल्याचे दिसून आले. भारतातील नितांतसुंदर निसर्ग किनारे, थक्क करणार्या स्थापत्यकलेचा आविष्कार असणारी धार्मिक स्थळे, खजुराहोची मंदिरे, गडकिल्ले, राजमहल, सांस्कृतिक परंपरा, लोकपरंपरा, लेण्या यांसारख्या असंख्य गोष्टी विदेशी पर्यटकांना खुणावत असतात. याखेरीज भारतातील कायदा-सुव्यवस्था हाही घटक विदेशी पर्यटकांसाठी महत्त्वाचा ठरतो. परंतु समाजातील काही विकृतींमुळे विदेशी पर्यटकांसोबत गैरवर्तन केले जाते आणि भारताच्या प्रतिमेला धक्का बसतो.

गेल्या काही दिवसांत भारतात महिलांविरोधातील गुन्ह्यांमध्ये मोठी वाढ झालेली दिसून येते. यामुळे जगभरात आपली नाचक्की होत असतानाच विदेशी महिला पर्यटकही नराधमांच्या वासनांचे बळी ठरत आहेत, ही बाब प्रचंड चिंताजनक आहे. कर्नाटकातील हम्पी येथे एका इस्रायली महिला आणि एका भारतीय महिलेसह दोन महिलांवर सामूहिक बलात्काराची घटना ताजी असतानाच, दिल्लीमध्ये एका ब्रिटिश पर्यटकावर अत्याचार झाल्याचे धक्कादायक प्रकरण समोर आले आहे. अशा घटनांमुळे भारताच्या जागतिक प्रतिमेवर गंभीर परिणाम होत आहे.

हम्पीतील घटना भयावह होती. रात्री कॅम्पिंग करणार्या तीन पर्यटकांना गुन्हेगारांनी नाल्यामध्ये फेकले आणि नंतर इस्रायली महिला आणि एका भारतीय महिलेसोबत सामूहिक बलात्कार केला. या दोन्ही महिलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले. या हल्ल्यात नदीत फेकलेल्या एका पर्यटकाचा मृत्यू झाला असून त्याचा मृतदेह सापडला आहे. पीडितांमध्ये एक अमेरिकन आणि दोन भारतीय होते. या गुन्हेगारांनी केवळ बलात्कारच केला नाही, तर मारहाण आणि लुटीचाही प्रकार घडवून आणला. तीनही गुन्हेगारांना अटक करण्यात आले असली, तरी देशाच्या प्रतिष्ठेला जो धक्का बसला आहे, त्याची भरपाई करणे कठीण आहे. भारताबाबत परदेशात सातत्याने नकारात्मक प्रतिमा तयार होत असून, दूरस्थ पर्यटनस्थळी अशा घटनांचे प्रमाण वाढताना दिसत आहे. दिल्लीतील घटनेत एक युवकाने सोशल मीडियाच्या माध्यमातून ब्रिटिश महिलेशी मैत्री केली आणि तिला भारतात येण्याचे आमंत्रण दिले. त्यानंतर दिल्लीतील एका हॉटेलमध्ये तिच्यावर अत्याचार केला. या घटनेची माहिती मिळताच ब्रिटिश दूतावासाने त्यावर गांभीर्याने लक्ष दिले आहे. अशा घटनांमुळे परदेशी सरकारे त्यांच्या नागरिकांसाठी भारताबाबत काही नकारात्मक सल्ला जारी करण्याची शक्यता आहे. भारत हे ऐतिहासिक, सांस्कृतिक आणि निसर्गसौंदर्याने परिपूर्ण देश असून, जगभरातील पर्यटकांसाठी एक प्रमुख आकर्षणकेंद्र आहे. परंतु, अलीकडील काही दशकांमध्ये विदेशी महिला पर्यटकांवरील लैंगिक अत्याचारांच्या घटनांनी भारताची प्रतिमा कलंकित केली आहे.

# आतडयांना आलेली सूज कमी करण्यासाठी दैनंदिन आहारात 'या' पदार्थांचे करा सेवन, शरीराला होतील अद्भूत फायदे



दैनंदिन आहारात सतत होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर लगेच परिणाम दिसून येतो. त्यामुळे खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये बदल करून शरीराला पचन होणाऱ्या पदार्थांचे सेवन करावे. शरीरात सर्वच अवयवांना पोषणाची आवशक्यता असते. त्यामुळे शरीरातील कोणत्याही अवयवांना इजा झाल्यानंतर संपूर्ण शरीराचे कार्य बिघडून जाते. शरीरात दोन आतडे असतात. लहान आणि मोठे आतडे जेवण पचनवण्यासाठी आवश्यक आहे. निरोगी आरोग्यासाठी आतडे निरोगी असणे आवश्यक आहे. मात्र अनेकदा पोटातील आतडयांना सूज येण्याची शक्यता असते. आतडयांना आलेली सूज शरीराची पचनक्रिया बिघडून टाकतात. याशिवाय पोटात जळजळ, अपचन, पोटात दुखणे इत्यादी अनेक गंभीर लक्षणे दिसून येतात.

जंक फूडचे अतिसेवन, व्यायामाचा अभाव, शारीरिक हालचालींची कमतरता इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम दैनंदिन आरोग्यावर लगेच दिसून येतो. यामुळे अनेकदा पोटामध्ये जळजळ वाढू लागते. पोटात वाढलेल्या जळजळमुळे शरीराची पचनक्रिया बिघडून जाते. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला आतडयांना आलेली सूज कमी करण्यासाठी आहारात कोणत्या पदार्थांचे सेवन करावे, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. चला तर जाणून घेऊया.

आतडयांना सूज आलेल्या शरीरात दिसणारी लक्षणे:

अपचन

पोटफुगणे

पोटदुखी आणि पोटात पेटके येणे

वारंवार शौचालय होणे

वजन कमी होणे

सतत मळमळ वाटणे

आहारात 'या' पदार्थांचे नियमित करा सेवन:

दही ताकाचे सेवन करणे:

आतडयांना सूज आल्यानंतर शरीराचे कार्य पूर्णपणे बिघडून जाते. त्यामुळे दैनंदिन आहारात दही किंवा ताकाचे सेवन करावे. यामध्ये असलेले प्रोबायोटिक्स शरीरात चांगल्या आतड्यांमधील बॅक्टरीया वाढतात, ज्यामुळे आतड्या निरोगी राहतात. तुम्हाला जर आतड्यांसंबंधित समस्या उद्भवत असतील तर नियमित दह्याचे सेवन करावे. यामुळे पचनक्रिया चांगली राहील.

कांदा आणि लसणीचे सेवन:

जेवणातील पदार्थ बनवताना कांद्याचे सेवन करावे. कांदा खाल्यामुळे शरीराला अनेक फायदे होतात. सकाळी उठल्यानंतर नियमित एक लसूण खाल्यामुळे शरीरातील कोलेस्ट्रॉल आणि इतर समस्यांपासून सुटका मिळेल. कांद्याचे सेवन नियमित जेवणात करावे. कांदा आणि लसूण खाल्यामुळे शरीरात चांगल्या बॅक्टरीयांची वाढ होते आणि आतड्या निरोगी राहतात.

हिरव्या पालेभाज्या:

हिरव्या पालेभाज्यांचे नियमित सेवन केल्यास शरीराला अनेक फायदे होतात. हिरव्या पालेभाज्या सहज पचतात. याशिवाय यामध्ये असलेले गुणकारी गुणधर्म शरीराला फायदेशीर ठरतात.

# उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पारंपरिक पद्धतीने बनवा ज्वारीच्या पिठाचे थंडगार आंबील, नोट करून घ्या रेसिपी

वाढत्या उष्णतेपासून शरीराचा बचाव करण्यासाठी दैनंदिन आहारात थंड पदार्थांचे सेवन केले जाते. थंड पदार्थांचे सेवन केल्यामुळे शरीरातील उष्णता कमी होऊन पोटात गारवा निर्माण होतो. याशिवाय उन्हाळ्यात पचनास जड असलेल्या पदार्थांचे सेवन करण्याऐवजी पचनास हलके आणि चविष्ट पदार्थ खावे. उन्हाळा सुरु झाल्यानंतर अनेक घरांमध्ये ज्वारीच्या पिठाचा वापर करून आंबील बनवले जाते. आपल्यातील अनेकांनी या रेसिपीचे नाव देखील ऐकले नसेल. ज्वारी आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आणि गुणकारी आहे. ज्वारीच्या धान्यांचा वापर करून पीठ तयार केले जाते. नंतर त्याच पिठाचा वापर करून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. ज्वारीमध्ये फायबर, जीवनसत्वे, खनिजे, अँटीऑक्सिडंट्स इत्यादी अनेक घटक आढळून येतात, त्यामुळे दैनंदिन आहारात ज्वारीच्या पिठापासून बनवलेले पदार्थ खावेत. चला तर जाणून घेऊया ज्वारीच्या पिठाचे आंबील बनवण्याची सोपी रेसिपी. साहित्य: तेल मोहरी ज्वारी हिरवी मिरची पांढरे तीळ कढीपत्ता मीठ खोबऱ्याचे तुकडे दही कृती: ज्वारीच्या पिठाचे आंबील बनवण्यासाठी सर्वप्रथम, ज्वारी घेऊन त्यात एक किंवा दीड ग्लास पाणी टाकून भिजवत ठेवा.






त्यानंतर भिजवून घेतलेली ज्वारी मिक्सरच्या भांड्यात टाकून बारीक वाटून घ्या. ज्वारीचे घट्टासर पेस्ट तयार करा. कढईमध्ये तेल गरम करून त्यात मोहरी, कढीपत्त्याची पाने, हिरव्या मिरचीचे तुकडे टाकून भाजून घ्या. त्यानंतर त्यात पांढरे तीळ आणि खोबऱ्याचे तुकडे टाका. व्यवस्थित फोडणी भाजल्यानंतर त्यात दही टाकून सतत मिक्स करून घ्या. त्यानंतर त्यात वाटून घेतलेले ज्वारीचा पिठाचा रस टाकून सतत मिक्स करून घ्या. तयार करून घेतलेल्या अंबिलमध्ये चवीनुसार मीठ टाकून मिक्स करा. अनेकांना आंबील हा पदार्थ थंड करून खायला खूप आवडतो. त्यामुळे बनवून घेतलेले आंबील थोडावेळ थंड करून नंतर खाऊ शकता.

# जीभ भाजल्यामुळे आवडत्या पदार्थांचा स्वाद चाखायला मिळत नाही? 'या' टिप्स ठरतील उपयोगी

आपल्या आवडीचा पदार्थ खाण्यास कोणास नाही आवडत. खरंतर कधी तो पदार्थ बनतोय आणि गरमागरम खायला मिळतोय. अशी प्रत्येकाची स्थिती होते. पण अनेकदा घाईगडबडीच्या नादात आपण तो पदार्थ एवढ्या लवकर खातो की आपली जीभच भाजून जाते. पण हे फक्त आपल्या आवडत्या पदार्थांच्या बाबतीत होते असे नाही. बऱ्याचदा गरम चहा, कॉफी, रोटी किंवा इतर कोणतेही पदार्थ खाताना जीभ जळते, ज्यामुळे आपल्याला पदार्थांची चवच चाखायला मिळत नाही.जीभ भाजल्यानंतर, बऱ्याच वेळा जळजळीमुळे जिभेवर फोड देखील येतात. ज्यामुळे खाणे-पिणे कठीण होते. जर तुमची जीभ गरम अन्नामुळे जळली असेल आणि तुम्हाला अन्नाची चव लागत नसेल तर काळजी करण्याची गरज नाही. काही सोप्या घरगुती उपायांचा अवलंब करून तुम्ही यातून लवकर आराम मिळवू शकता.थंड पाणी प्याजीभ जळल्यानंतर पहिला आणि सोपा उपाय म्हणजे ताबडतोब थंड पाणी पिणे. यामुळे जळजळ कमी होऊ शकते. तसेच प्रभावित भागात थंडावा देखील मिळतो. यामुळे लवकर आराम मिळू शकतो आणि तुम्ही अन्नाची चव देखील परत मिळू शकते.थंड गोष्टींचे सेवनजिभेवर बर्फाचा तुकडा किंवा थंड दूध लावल्याने जळजळ कमी होते. तुम्ही आईस्क्रीम किंवा थंड दही देखील खाऊ शकता, ज्यामुळे तुम्हाला आराम मिळेल.मध वापरा मधात नैसर्गिक गुणधर्म असतात. जे जळजळ झाल्यास जिभेवरील सूज कमी करते. यामुळे जखम लवकर बरी होण्यास मदत होते.साखर खावा तुमच्या जिभेवर एक छोटा चमचा साखर किंवा साखरेची कँडी ठेवा आणि ते हळूहळू खावा. यामुळे जळजळ कमी होण्यास आणि चव परत येण्यास मदत होते.कोरफडीचे जेल लावा कोरफडीमध्ये थंडावा देणारे आणि उपचार करणारे गुणधर्म आहेत. तुम्ही जिभेवर ताजे कोरफडीचे जेल लावू शकता, यामुळे तुम्हाला वेदनांपासून आराम मिळेल.सौम्य मिठाच्या पाण्याने गुळणा कराकोमट पाण्यात थोडे मीठ मिसळून गुळण्या केल्याने जळजळ कमी होते आणि संसर्गाचा धोका देखील कमी होतो. थंड हर्बल चहा प्या कॅमोमाइल किंवा ग्रीन टी सारख्या थंड हर्बल टीमुळे जिभेची जळजळ कमी होण्यास मदत होते. तसेच जळजळ देखील कमी होते. मसालेदार आणि गरम पदार्थ टाळा जीभ पूर्णपणे बरी होईपर्यंत मसालेदार, गरम आणि आंबट पदार्थ टाळा. यामुळे जळजळ वाढू शकते.



# टॉयलेट सीटवरील हट्टी डाग क्षणार्धात होतील दूर; वॉशरूम दिसू लागेल नव्यासारखे फक्त या ३ जादुई ट्रीक्सचा वापर करा

निरोगी राहण्यासाठी खाण्याच्या चांगल्या सवयींसोबतच स्वच्छतेचीही विशेष काळजी घ्यायला हवी. अनेकदा लोक आपल्या खाण्या-पिण्याकडे, घराच्या स्वछतेकडे तर लक्ष देतात मात्र घरातील एक जागा सर्वांच्या नजेरेतून राहून जाते. ही जागा म्हणजे घरातील टॉयलेट. सर्वात जास्त घाण आणि बॅक्टेरियाज टॉयलेटसीटवर आढळून येतात, अशात वेळोवेळी याची स्वच्छता राखणे फार गरजेचे असते.

वॉशरूमच्या स्वच्छतेकडे विशेष लक्ष देणे आवश्यक आहे, कारण वॉशरूममध्ये असलेली टॉयलेट सीट रोगांचे घर आहे, ज्याची वेळोवेळी स्वच्छता करणे आवश्यक आहे. अनेक वेळा अनेक प्रयत्न करूनही टॉयलेट सीटवरील हट्टी डाग काही केल्या जात नाहीत. अशात आज आम्ही तुम्हाला काही घरगुती ट्रिक्सविषयी माहिती सांगत आहोत ज्यांचा वापर करून तुम्ही तुमच्या घरातील घाण जुने टॉयलेट स्वछ आणि नव्यासारखे बनवू शकता. चला याविषयी सविस्तर जाणून घेऊया.

बेकिंग सोडा आणि व्हिनेगर पेस्ट

टॉयलेट सीट साफ कर्नूसाठी तुम्ही बेकिंग सोडा व्हिनेगरचा वापर करू शकता. टॉयलेट सीट्स स्वच्छ करण्यासाठीचा हा एक उत्तम मार्ग आहे. ही पेस्ट अम्लीय आहे, जी डाग काढून टाकण्यास आणि सीटचे निर्जंतुकीकरण करण्यास मदत करते. यासाठी डाग असलेल्या भागांवर थोडासा बेकिंग सोडा शिंपडा. नंतर बेकिंग सोड्यावर पांढरा व्हिनेगर घाला किंवा स्प्रे करा, एक फिजी पेस्ट तयार करा. पेस्ट कमीतकमी १५-३० मिनिटे किंवा जास्त काळ टॉयलेट सीटवर तशीच राहू द्या. नंतर स्क्रब, ब्रश किंवा स्पंजच्या वापराने टॉयलेट सीट घासून काढा.

लिंबाचा रस आणि मीठ

लिंबाचा रस आम्लयुक्त असतो आणि त्यात नैसर्गिक ब्लीचिंग गुणधर्म असतात, तर मीठ डागांवर कठोर हल्ला करते, ज्यामुळे ते काढणे सोपे होते. अशात या दोघांचे संमिश्र टॉयलेट सीटवरील घाण दूर करण्यास मदत करेल. यासाठी लिंबाचा रस थेट डागांवर पिळून घ्या. मग लिंबाच्या रसावर थोडे मीठ शिंपडा. आता ही पेस्ट १५-२० मिनिटे टॉयलेट सीटवर तशीच राहू द्या. यानंतर ब्रश किंवा स्पंजने डाग घासून काढा आणि मग पाण्याने तो भाग धुवून काढा.



महिलांनो सावधान! रक्तातील साखर वाढताच हृदयाचा धोकाही वाढतो; मधुमेहाच्या रुग्णांनी 'या' ४ गोष्टींची विशेष काळजी घ्यावी

व्हिनेगर टॉयलेट सीटवरील हट्टी डाग साफ करण्यासाठी तुम्ही व्हिनेगरचाही वापर करू शकता. व्हिनेगर आम्लयुक्त आहे, जे त्यांच्या मुळांपासून डाग काढून टाकण्यास मदत करते. यासाठी टॉयलेट सीटवर डाग पडलेल्या भागांवर थेट व्हाइट व्हिनेगर लावा. सुमारे १५-३० मिनिटे याला तसेच राहू द्या. व्हिनेगरच्या अम्लीय स्वभावामुळे डाग दूर होतात. डाग पूर्णपणे स्वच्छ करण्यासाठी स्क्रब ब्रश किंवा स्पंज वापरा. टॉयलेट सीट स्वच्छ पाण्याने घासून धुवा आणि कमाल बघा.

# डिजिटल युगात वाढतोय चा धोका! लक्षणे ओळखून वेळीच घ्या योग्य ते औषध उपचार

कोरोनानंतरच्या काळात जीवनशैलीमध्ये अनेक बदल झाले आहेत. जीवनशैलीत होणाऱ्या बदलांचा परिणाम आरोग्यावर सुद्धा लागलेच दिसून येतो. कामाचा वाढलेला तणाव, अपुरी झोप, सतत जंक फूडचे सेवन, सतत मोबाईल किंवा लॅपटॉपवरील वाढलेला काम, मानसिक आणि शारीरिक तणाव इत्यादी अनेक गोष्टींचा परिणाम आरोग्यावर लगेच दिसून येतो. मात्र हल्ली बदलेल्या जीवनशैलीमुळे अनेक तरुणांमध्ये सर्व्हायकल पेनचा धोका वाढू लागला आहे. दैनंदिन वापरात सतत डिजिटल प्रॉडक्टचा वापर केल्यामुळे मान दुखणे, कंबर दुखणे, पाठ दुखणे, डोकं दुखणे इत्यादी अनेक लक्षणे शरीरात दिसू लागतात.सर्व्हायकल पेनची लक्षणे शरीरात दिसू लागल्यानंतर बऱ्याचदा दुर्लक्ष केले जाते. मात्र या लक्षणांकडे दुर्लक्ष करणे आरोग्यासाठी घातक ठरू शकते. सर्व्हायकल पेनची लक्षणे शरीरात दिसू लागल्यानंतर मानेच्या भोवती तीव्र वेदना होऊ लागतात. या वेदना हळूहळू वाढू लागतात. आधिकवेल लॅपटॉप किंवा मोबाईल घेऊन बसल्यामुळे मानेभोवती वेदना होऊ लागतात. मान न हलवल्यामुळे मानेभोवती कडकपणा येतो आणि मान हलत नाही. पण सुरवातीच्या दिवसांमध्ये सामान्य वाटणाऱ्या वेदना लवकर बऱ्या होत नाही. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला सर्व्हायकल पेन होण्यास सुरुवात झाल्यानंतर शरीरात कोणती लक्षणे दिसू लागतात? कोणते उपाय करून आराम मिळवावा? याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत. सर्व्हायकल पेनची लक्षणे: मानेच्या आजूबाजूला सूज येणे. मान हलवताना वेदना होणे मानेपासून वेदना डोक्यापर्यंत वेदना होणे स्वभाव चिडचिडा होणे मानेला सूज येणे तंबाखू किंवा गुटखा खाऊन लाल झालेले दात स्वच्छ करण्यासाठी 'या' फळांच्या सालीचा करा वापर, दात होईल मोत्यासारखे पांढरेशुभ्र सर्व्हायकल पेनची समस्या कमी वयात उद्भवल्यानंतर डॉक्टरांच्या सल्ल्याने योग्य ते औषध उपचार करावे. याशिवाय दिवसभरातून दोन ते तीन वेळा मान ३६० डिग्रीमध्ये वाळवावी. रात्रीच्या वेळी झोपताना डोक्याखाली मऊ आणि आरामदायी उशीचा वापर करावा. याशिवाय सरळ पोझिशनमध्ये झोपण्याचा प्रयत्न करावा, ज्यामुळे मानेवर तणाव येणार नाही. तसेच शरीरातील हाडे निरोगी राहण्यासाठी भरपूर पाण्याचे सेवन करावे. दैनंदिन आहारात ड्रायफ्रुटस आणि फळे भाज्यांचे सेवन करावे. बॉडी स्ट्रेचिंग, हातांना स्ट्रेच करणे, मानेला मागे पुढे वाकवणे इत्यादी हालचाली करणे आवश्यक आहे. या हालचाली केल्यामुळे मानेमधील वेदना कमी होतील आराम मिळेल.



# ५ मिनिटांमध्ये उन्हाळ्यासाठी बनवा थंडगार आंबट-गोड-तिखट कैरीचे सरबत, शरीरात कायम राहील थंडावा

कच्च्या कैरीचे नाव घेतल्यानंतर सगळ्यांच्या तोंडाला पाणी सुटते. कैरीपासून अनेक वेगवेगळे पदार्थ बनवले जातात. उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये बाजारात मोठ्या प्रमाणावर कैरी उपलब्ध असते. याशिवाय उन्हाळ्यात शरीर थंड ठेवण्यासाठी वेग्वेगळ्या सरबताचे सेवन केले जाते. सरबत प्यायल्यामुळे शरीराला थंडावा मिळतो. त्यामुळे उन्हाळ्यात नेहमी सरबताचे सेवन करावे. शरीरात उष्णता वाढल्यानंतर आरोग्यासंबंधित अनेक समस्या उद्भवू लागतात. शरीराची ऊर्जा कमी झाल्यानंतर थकवा आणि अशक्तपणा जाणवू लागतो. त्यामुळे आज आम्ही तुम्हाला उन्हाळ्यात शरीरात थंडावा राहण्यासाठी सोप्या पद्धतीमध्ये कैरीचे सरबत कसे बनवावे, याची सोपी रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीने बनवलेले कैरीचे सरबत घरातील लहान मुलांपासून मोठ्यांपर्यंत सगळ्यांचं खूप आवडतो.

साहित्य: कैरी पुदिना काळ मीठ साखर लिंबू जिऱ्याची पावडर हिरवी मिरची

कृती:

कैरीचे सरबत बनवण्यासाठी सर्वप्रथम, कैरी स्वच्छ धुवून त्याच्या वरील साल काढून घ्या.


त्यानंतर कैरीचे बारीक तुकडे करा. मिक्सरच्या भांड्यात कच्च्या कैरीचे तुकडे, हिरवी मिरची आणि पुदिन्याची पाने टाकून बारीक वाटून घ्या.

नंतर त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून त्यात साखर, जिऱ्याची पावडर आणि काळ मीठ घालून पुन्हा एकदा फिरवून घ्या.

बनवून घेतलेला सरबत गाळणीच्या सहाय्याने गाळून घ्या. काचेच्या ग्लासात बर्फ टाकून त्यात कैरीचे सरबत ओतून मिक्स करा.

नंतर त्यात सगळ्यात शेवटी लिंबाचा रस टाकून मिक्स करा.

तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये बनवलेले आंबट तिखट कैरीचे सरबत.





# यशवंतराव चव्हाण संकुल येथील सील झालेले गाळे खुले. प्रशासनाच्या निर्णयाचे व्यापाऱ्यांकडून स्वागत








लातूर : अकृषी कर थकबाकी वसुलीसाठी महापालिकेचे यशवंतराव चव्हाण संकुल येथील ३२ गाळे महसूल विभागाच्या वतीने दिनांक २४ मार्च २०२५ रोजी सकाळी ७.३० च्या सुमारास तहसिलदार सौदागर तांदळे यांच्या उपस्थितीत सील करण्यात आले होते. महसूल विभागाच्या या कारवाईने येथील गाळेधारकात प्रचंड रोष निर्माण झाला होता. हे सील प्रशासनाने काढावे यासाठीचे प्रयत्न व्यापारी तसेच माझं लातूर परिवाराच्या वतीने करण्यात येत होते. यासंदर्भात लातूर शहरचे आमदार अमित देशमुख, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर, तहसिलदार सौदागर तांदळे, मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे, मनपा उपायुक्त पंजाबराव खानसोळे पाटील यांच्याकडे माझं लातूर परिवाराच्या वतीने त्वरीत निर्णय घेण्याची विनंती करण्यात आली होती. या विनंतीला सकारात्मक प्रतिसाद देत आमदार अमित देशमुख यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन ४ ऑक्टोबर २०२४ रोजी राज्य सरकारने अकृषिक कर रद्द करण्यात आल्याचा निर्णय घेतल्याचे अवगत करून दिले. या शासन निर्णयाची घोषणा २५ मार्च २०२५ रोजी सभागृहात पुन्हा एकदा मुख्यमंत्री फडणवीस यांनी करताच जिल्हा प्रशासनाने संकुलातील सर्व सील केलेले गाळे महसूल अधिकारी यांच्या उपस्थितीत दुपारी ३ वाजता खुले केले आहेत. जिल्हा प्रशासनाच्या या निर्णयाचे संकुलातील सर्व व्यापारी आणि माझं लातूर परिवाराच्या वतीने स्वागत करण्यात येत आहे.

## मनपा उपायुक्त पदी कैलास केंद्रे रुजू



लातूर/ प्रतिनिधी: लातूर शहर महानगरपालिकेत उपायुक्त म्हणून कैलास रमेश केंद्रे हे रुजू झाले. मंगळवारी (दि. २५) त्यांनी पदभार स्वीकारला.

मूळचे जळकोट तालुक्यातील बोरगाव येथील असणारे रमेश केंद्रे यांची २०१५ मध्ये शासकीय सेवेत नियुक्ती झाली. यापूर्वी त्यांनी माढा नगरपंचायत येथे अडीच वर्ष काम केले. त्यानंतर सांगोला नगर परिषदेत साडेतीन वर्ष कार्यभार सांभाळला. मागील अडीच वर्षांपासून ते आळंदी येथे मुख्याधिकारी म्हणून कार्यरत होते. आळंदी येथून पदोन्नती झाल्याने त्यांची लातूर महानगरपालिकेत उपायुक्त पदी पदस्थापना झाली आहे. मंगळवारी त्यांनी पदभार स्वीकारला.मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी त्यांचे अभिनंदन करून कामकाजासाठी शुभेच्छा व्यक्त केल्या.

## महसूल कर्मचाऱ्यांचे लोकेशन घेऊन उपसा करतात रेती तस्कर

किनवट: शेख शौकत :–किनवट तालुक्यातील एकाही रेती घाटांचा लिलाव झालेला नाही. असे असले तरी अवैध वाळू उपसा करणारे रेती व मुरूम चोरटे महसूल विभागाच्या अधिकारी कर्मचाऱ्यांचे लोकेशन घेऊन दिवस असो किंवा रात्र मोठ्या प्रमाणात वाळू उपसा करीत आहेत. त्यासाठी शनिवार आणि रविवार हा सुटीचा दिवस तर वाळू माफियांसाठी व मुरूम माफियासाठी बोनस ठरत आहे. किनवट तालुक्यात शासन दरबारी नोंद असलेल्या १४, तर नोंद नसलेल्या अनेक रेती घाटातून अवैध वाळू उपसा आणि तालुक्याच्या जवळच्या परिसरातून अवैध मुरूम माफिया टिप्पर व ट्रॅक्टर वर वाहतूक करून त्याची विक्री केली जातात अशी चर्चा नागरिकांमध्ये चालू आहे. तर काही रेती चोरटे रेती घाटातून अवैध वाळू उपसा करतात आणि मग महसूल विभाग तो जप्त करून त्या रेती साठ्याचा लिलाव करतात. रेती माफिया जप्त केलेल्या रेतीच्या नाही. साठ्याला हात न लावता नदी, नाल्याच्या पात्रातून बिनदिक्कतपणे उपसा करून त्याची वाहतूक करतात. किनवट शहर व परिसरात गर्दभ व खेचरच्या साहाय्याने होणारी वाळू वाहतूक त्यात आता पिवळ्या ट्रॉलीच्या आटोची व बैलगाडीची भर पडली आहे. माहूर तालुक्यातील सात रेती घाटातून ४१३ ब्रास जप्त करून त्या साठ्याचा लिलाव झाला आहे. मात्र, किनवट तालुक्यात जप्त झालेल्या ९४ ब्रास रेतीच्या साठ्याच्या लिलावात कोणीही सहभागी व्हायला तयार नसल्याचे सांगण्यात येत आहे. माहूर तालुक्यातून रात्रीच्या वेळी तीन ब्रासचे टिप्पर किनवट तालुक्यात येत असून २५ हजार रेती तर जवळच्या शिवारातून मुरूम आठ ते दहा हजार टिप्पर रुपयांत एक टिप्पर भिडते .त्या टिप्पर मध्ये तीन ब्रास रेती व मुरूमची विक्री केली जात आहे. दररोज महसूल विभागाचे लोकेशन घेऊन अवैध वाळू व अवैध मुरूम खनान माफियाला वाहतूक करणाऱ्यांसाठी शनिवार व रविवार हे सुटीचे दोन दिवस फायदेशीर ठरत आहे.

## अपर पोलीस महासंचालक नवल बजाज लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर..

लातूर :– दिनांक २४ मार्च २०२५ रोजी पासून महाराष्ट्र राज्य दहशतवाद विरोधी पथकचे अपर पोलीस महासंचालक श्री. नवल बजाज हे वार्षिक निरीक्षण व तपासणी ०३ दिवसीय लातूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर असून त्यानिमित्त आज रोजी पोलीस मुख्यालयात पोलीस समारंभ कवायतचे (परेड) आयोजन करण्यात आले होते. समारंभ कवायतचे (परेड) श्री. नवल बजाज यांनी निरीक्षण केले.

परेड चे संचालन पोलीस अधीक्षक, श्री सोमय मुंडे, सेकंड इन–कमांड, बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे, खझड परिविक्षाधीन अधिकारी यांनी केले.

पोलीस परेड नंतर लातूर पोलीस दलाकडून मॉब डिसपर्सल, दंगा काबू योजना ची प्रत्यक्षिक सदर करण्यात आले. तसेच पोलिस अधीक्षक कार्यालयातील नवीनच बनविण्यात आलेले मंथन मीटिंग हॉल चे उद्घाटन श्री. नवल बजाज यांचे हस्ते करण्यात आले.

श्री.नवल बजाज यांचे मार्गदर्शनात गुन्हे आढावा बैठक घेण्यात आली यामध्ये पोलिस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे, परीक्षाधीन पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, सागर खर्डे, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर जिल्ह्यातील सर्व पोलिस ठाणे प्रभारी अधिकारी, शाखा प्रभारी अधिकारी यांची उपस्थिती होती.



## सीबीसीटीच्या माध्यमातून मौखिक रोगांचे अचूक निदान

### डॉ. प्रशांत शिर्के यांची माहिती; एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात मुख क्ष – किरण शास्त्र कार्यशाळा



लातूर : – सीबीसीटी म्हणजेच कोनबीन कॉम्पुटेड टोमोग्राफी हे मौखिक तपासणीचे अत्याधुनीक उपकरण आहे. क्ष – किरणाव्दारे जबड्यांची व मुखाची ३ – डी डायमेन्शन स्वरुपात चाचणी करण्यात येते. सीबीसीटी मशीनच्या माध्यमातून केलेल्या चाचणीतून सर्व प्रकारच्या मौखिक रोगांचे अचूक निदान करता येते, अशी माहिती मुंबई येथील मुख औषध शास्त्र व क्ष – किरण शास्त्र तज्ज्ञ डॉ. प्रशांत शिर्के यांनी दिली. एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख औषध शास्त्र व क्ष – किरण शास्त्र विभाग आणि भारतीय मुख औषध शास्त्र व क्ष – किरण शास्त्र महाराष्ट्र राज्य शाखा यांच्या वतीने तीन दिवशीय सीबीसीटी कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. प्रशांत शिर्के बोलत होते. यावेळी महाराष्ट्र राज्य दंत परिषदेचे प्रतिनिधी डॉ. शिवानंद दडगे, मुख शल्य तज्ज्ञ डॉ. अमोल डोईफोडे, ओएमडीआर विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले यांची प्रमुख उपस्थिती होती. दातांमध्ये असलेले क्रॅक फ्रॅक्चर तसेच दातांना किडीमुळे होणारे अपाय, दाताच्या बाजूला असलेल्या हाडांमधील अपायांचे प्राथमीक अवस्थेत निदान होऊ शकते. प्राथमीक अवस्थेत निदान झाल्यामुळे उपचार लवकर होतो व त्यामुळे होणारा त्रास व हानी न होता रुग्णांना त्याचा फायदा होऊ शकतो असे सांगून यावेळी पुढे बोलताना डॉ. प्रशांत शिर्के म्हणाले की, अपघातामुळे जबड्याला व मुखाला झालेल्या दुखापतीचे योग्य निदान या उपकरणाव्दारे होते. त्यामुळे योग्य उपचार पध्दती लवकर अवलंबीता येते. हाडात अडकलेल्या अक्कल दाडा तसेच जबड्यांच्या इतर भागात असलेल्या दाढा, उपदाढा व दात यांची अचुक जागा व त्यांचे त्याजवळ असलेल्या रक्तवाहिन्या व मज्जातंतू यांची जागा अचूक दाखवून देते. ३–डी दंत सीबीसीटी चाचणी मधुन मिळणारे एकूण रेडिएशन डोस पारंपारीक सीटी परिक्षणा पेक्षा बरेच कमी असतात. पारंपारीक सीटीच्या तुलनेने सीबीसीटी मध्ये एक्स्पोजरचा वेळ देखील तुलनेने कमी असतो. ३–डी दंत सीबीसीटीचा स्कॅन रुग्णांच्या डोक्याभोवती फिरतो. ज्यामुळे वेगवेगळ्या थरातून प्रतिमा मिळतात. सीबीसीटी मध्ये मिनीटापेक्षा कमी वेळात विविध कोणातून सुमारे १५० इतक्या प्रतिमा कॅप्चर केल्या जातात. या डेटा आधारे दात, तोंड, जबडा, मान, कान, नाक व घसा या अवयवांची ३ – डी प्रतिमा पुर्नबांधणी करण्यासाठी मदत होते. चांगली प्रतिमा आणि गुणवत्ता आणि अचुकता, तोंडाच्या आरोग्याबद्दल समावेशक माहिती, कमी प्रमाणात रेडीएशन हे ३ – डी सीबीसीटी तपासणी करण्याचे फायदे आहेत. त्याचबरोबर जबड्यांचे आकार व परिणाम यांचे अचूक मोजमाप केले जाते. गंभीर आजार दर्शवू शकतो. कृत्रिम दंत रोपणासाठी सीबीसीटी तपासणी करणे महत्त्वाचे असते. उपलब्ध जबड्याचे हाड, मॅक्सीलरी सायनस अर्थात हाडातील नाकाच्या बाजुची पोकळी आणि संवेदी नसा यांचे स्थानिकरण योग्य रित्या करुन दंत रोपनाची जागा निश्चित केली जाते. या कार्यशाळेस महाराष्ट्र राज्य दंत परिषदेच्या वतीने सहभागी संशोधकांना १८ गुण प्राप्त झाले. सूत्रसंचालन स्नेहलता गायकवाड यांनी केले तर आभार डॉ. अभय कुलकर्णी यांनी मानले. या कार्यशाळेत विभाग प्रमुख डॉ. विजयालक्ष्मी माले यांनी मार्गदर्शन केले. या कार्यशाळेत डॉ. अभय कुलकर्णी, डॉ. प्रियंका लासुणे, डॉ. रोहिणी दिवेकर, डॉ. सायोज्यता बांगर यांनी सहभाग नोंदवला. या वेळी विभाग प्रमुख डॉ. प्रविणकुमार मरुरे, डॉ. अमोल बडगीरे, डॉ. सुशेन गाजरे, डॉ. राघवेंद्र मेत्री, डॉ. योगेश काळे व डॉ. ओम बघेले हे उपस्थित होते.

## बौध्दांनो सारा भारत बौद्धमय करण्यास सज्ज व्हा..!

बिहार राज्यात गया येथील महाबोधी महाविहाराच्या कमिटीमध्ये ४ ब्राह्मण हिंदू, ४ बौध्द व १ जिल्हाधिकारी (हिंदू ) असे ९जण आहेत. अशी वर्गवारी कायम ठेवल्यामुळे त्या विहारात हिंदूंचे प्रमाण ५४ असे व्यस्त असल्यामुळे ते हिंदुचेच कांड चालवितात. यांस महाबोधी बौद्ध विहार म्हणतात पण त्यांनी तिथे चालविली ती विडंबने, ते बुद्धप्रतिकाचे हिंदूकरण करीत आले. ही निव्वळ धुळफेक करता आली. भारत देशातून बौद्ध धम्माचा ऱ्हास होऊन कित्येक वर्षे उलटली. जागतिक पातळीवरील बौद्ध राष्ट्राना कमिटीत बौध्दांची गणसंख्या दाखवून विहारात हिंदूनी बौद्ध परंपरा न जोपसता हिंदूची धार्मिक कार्यें सातत्याने जोपसत असतात. ही बाब भारतीय बौद्ध भन्तेजीच्या निदर्शनास यावयास उशीर झाला. ही बाब आज पंच्याहत्तर वर्षे लोटल्या नंतर लक्षात आलेली असली तरी त्यांचेसह बौद्ध जनता आज जागरूक होऊन महाबोधी महाविहार सम्पूर्ण बौद्धाच्या ताब्यात यावे याकरिता भारत/राज्य सरकाराकडे शांततेच्या मार्गाने मागणी करीत आहे. भारतीय कायद्याने बुद्धिस्ट टेम्पल अक्ट १९४९चा कायदा रद्द करुन आम्ही बौद्ध आहोत तेथे हिंदुचे वर्चस्व कशाला ? ते वर्चस्व तर बौध्दांकडे असले पाहिजे. महाबोधी महाविहार बौद्धाच्या ताब्यात दिलेच पाहिजे. ही बौद्धाची मागणी रास्त आहे. आज उपोषणकर्ते यांचा अडतीसावा दिवस आहे. आणि भारतातील बौद्ध जनता व भारता बाहेरील बौद्ध राष्ट्र या मागणीचे जोरदार समर्थन करीत आहेत. बी टी अक्ट १९४९ भारतीय घटनेबाहेरील कायदा आजपर्यंत लागू राहिला हे एक कोडे आहे. भारतात बौध्द विहाराची मागणी करणारांची संख्या पुरेशी नव्हती परंतु जगातील बौद्ध राष्ट्राना बुध्दाला ज्ञानप्राप्ती ज्या पिंपळवृक्षखाली झाली ते पवित्र स्थळ भारतातील बिहार राज्यात गया येथे आहे हे कळावे जेणेकरून या कडे पर्यटक भेट देण्यास येतील आणि भारताला आर्थिक पाठबल मिळेल. असे धंदेवाईक धोरण असावे. हे अगदी तंतोतंत खरे असले तरी त्या पासून मिळणाऱ्या आर्थिक निधीचा वापर बौद्ध धम्म वाढीस न होता तो हिंदू ब्राह्मणांच्या अधिकारात त्या आर्थिक निधीचा वापर कोठे होतो ते समजणे न लगे. आणि तेथील कमिटीवर असलेल्या त्या ४ बौद्ध प्रतिनिधी बद्दल बोलावेसे वाटते ते हे की ते किती खरे किती खोटे बौद्ध अशी शंका येते. या भारत भूमीत सम्राट अशोकाने निर्माण केलेल्या ८४ हजार बौद्ध स्तूपाचे अवस्थेकडे पाहून आपल्याला काय वाटते ? सरकारकडे पुरातत्व खाते असतांनाही कारभारात अतिक्रमण झाल्याचे आढळून येते. यावरूनच शंकेला वाव आहे. असे म्हणावेसे वाटते. आपण पाहिले आस्था या एकाच मुद्यावरून बाबरी मस्जिद पाडणाऱ्या हिंदूंना त्याच जागी राम मंदिर बांधण्यास मंजुरी देणारे सुप्रीम कोर्ट आता बौद्धाना कोणता निर्णय देते ? संविधानिक की असंविधानिक ? आस्था या प्रकरणाचा आशय हा विषय मनुस्मृति कायद्याप्रमाणे अधिक जवळचा वाटावा असेच म्हटले पाहिजे. अप्रत्यक्षपणे बाबरी मस्जिद पाडूनच त्याची सुरुवात झाल्याचे संकेत मिळतात. आम्ही मात्र कायम संविधानातील नियमाचा कायद्याचा आग्रह धरणार! आता आमुचे यशस्वीतेकडे पाऊल पडणार अपयश येणार नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा भारताला बौद्धमय करणारा संकल्प अजून अपूर्ण आहे तो पूर्ण करणाऱ्या अनुयायींमध्ये दिवसेंदिवस वाढ होते आहे. तो पूर्ण होईलच आता माघार नाही. महाबोधी महाविहार ही आता पहिली पायरी असेल नंतर बौद्धमय भारताला वैभव प्राप्त करणारी सम्राट अशोक कालीन शिल्पे, लेण्या, गुहा, स्तुपे,विहार या ऐतिहासिक वास्तू पुनर्जिंवीत होतीलच. यासाठी भारत आणि भारताबाहेरील बौद्ध राष्ट्र जागृत करणे हे आता सुलभ होणारे आहे. आणि म्हणून याकरिता सर्व मानवता – पशुप्रेमी नगरीकांनी पुढाकार घेऊन मंगलमय कार्य करणे हिच मंगलकामना..! जयभीम..! नमो बुध्दाय..!

## लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

लातूर :– कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी केशव नेटके यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) व (३) नुसार संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी केले आहेत. हा आदेश संपूर्ण लातूर जिल्ह्याच्या हद्दीत २६ मार्च, २०२५ रोजीच्या ००.०१ वाजेपासून ते ९ एप्रिल, २०२५ रोजीच्या २४.०० वाजेपर्यंत (दोन्ही दिवस धरुन) लागू राहील.

शस्त्रबंदी व जमावबंदी काळात या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत घेऊन फिरता येणार नाही. कोणताही दाहक पदार्थ किंवा स्फोटक पदार्थ बाळगता येणार नाही, दगड किंवा इतर क्षेपणास्त्रे, सोडावयाची किंवा फेकावयाची उपकरणे बाळगणे किंवा जमा करणे किंवा तयार करण्यास मनाई राहील. व्यक्तीचे प्रेत, आकृत्या किंवा प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. तसेच जाहीरपणे घोषणा करणे, गाणे म्हणजे वाद्य वाजविण्यास मनाई राहील. ज्यामुळे सभ्यता अगर नितीमत्ता यास धोका पोहोचेल अशा किंवा राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा ज्यामध्ये उलथवून टाकण्याची प्रवृत्ती दिसून येत असेल अशी आवेशपूर्ण भाषणे, हावभाव करणे, सोंग आणणे, चित्रे, चिन्हे फलक किंवा इतर कोणत्याही जिन्नस किंवा वस्तू तयार करणे, त्यांचे प्रदर्शन किंवा प्रसार करणे यास मनाई करण्यात आली आहे.

लातूर जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी

जिल्ह्यात सार्वजनिक शांतता व सुव्यवस्था राहण्यासाठी कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास, मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अंत्ययात्रा, विवाह, कामावरील पोलीस किंवा इतर शासकीय अधिकारी, कर्मचारी यांना लागू राहणार नाही. तसेच शस्त्रबंदी व जमावबंदी काळात सभा, धार्मिक मिरवणूक, मोर्चा, उपोषण यांना परवानगी देण्याचे सर्व अधिकार हे पोलीस अधीक्षक, पोलीस उपअधीक्षक व संबंधित पोलीस निरिक्षक, पोलीस उपनिरीक्षक यांना राहतील. त्यांनी परवानगी देण्यापूर्वी उपविभागीय दंडाधिकारी यांच्याशी सल्लामसलत करून परवानगी द्यावी, असे अधिसूचनेत नमूद करण्यात आले आहे.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE